उहन - ३

## Annexure "A"

All those pieces or parcel of land lying and being situated at Village Dwarli, Taluka Ambernath, Dist. Thane, within the Limits of Gram Panchayat Dwarli and in the registration District Thane and Sub-District Ulhasnagar

| Survey Nos. | Name on 7/12 | Sq. Mts |
|---|---|---|
| 36/6/1 | Anjaneya Land & Property Developers | 2730 |
| 35/2 | Anjaneya Land & Property Developers | 2780 |
| 36/13 | Anjaneya Land & Property Developers | 12100 |
| 37/3 | Anjaneya Land & Property Developers | 2920 |
| 35/1/D | Anjaneya Land & Property Developers | 2950 |
| 36/5/D | Anjaneya Land & Property Developers | 3050 |
| 36/5/F | Anjaneya Land & Property Developers | 750 |
| 36/5/E | Anjaneya Land & Property Developers | 380 |
| 36/1 | Anjaneya Land & Property Developers | 2200 |
| 36/2 | Anjaneya Land & Property Developers | 4000 |
| 36/3 | Anjaneya Land & Property Developers | 600 |
| 35/13 | Anjaneya Land & Property Developers | 300 |
| 36/11 | Anjaneya Land & Property Developers | 9100 |
| 35/1/C | Anjaneya Land & Property Developers | 1450 |
| 36/5/A | Anjaneya Land & Property Developers | 750 |
| 35/1/B | Anjaneya Land & Property Developers | 500 |
| 36/5/B | Anjaneya Land & Property Developers | 750 |
| 34/3/B | Anjaneya Land & Property Developers | 2730 |
| 35/1/E | Anjaneya Land & Property Developers | 500 |
| 36/5/H | Anjaneya Land & Property Developers | 750 |
| 36/5/I | Anjaneya Land & Property Developers | 380 |
| 35/1/A | Anjaneya Land & Property Developers | 1180 |
| 35/5/A | Anjaneya Land & Property Developers | 600 |
| 36/5/K | Anjaneya Land & Property Developers | 2900 |
| 39/3 | Anjaneya Land & Property Developers | 303.5 |
| 36/7/A | Dhanibai Namdeo, Eknath Chikankar & Othrs | 12000 |
| 36/12 | Dhanibai Namdeo, Tulsiram Chikankar & Othrs | 4000 |
| 35/15 | Maharashtra Shashan | 910 |
| 35/3 | Maharashtra Shashan | 7330 |
| 35/12/A | Maharashtra Shashan | 210 |
| 35/7 | Rajaram Chikankar & Othrs | 1170 |
| 34/1B/2A/5A | Shantabai Barku Mahtre | 4500 |
| 36/4 | Shantabai Barku Mahtre | 1100 |
| 38 | Shantabai Barku Mahtre | 21200 |
| 39/1 | Shantabai Barku Mahtre | 4780 |
| 35/10/A | Tukaram Katod, Kusum Chinkar & othrs | 1090 |
| 35/14 | Tulsiram Chinkar, Mulabai Mahtre & Othrs | 100 |
| 36/7/B | Vasudev Gangaram, Tukaram Katod & othrs | 15000 |
| Total | | 130043.5 |

PAYABLE AT ALL OUR BRANCHES IN CLEARING

दिनांक
Date 17-01-2011

Pay M/s. Anjaneya Land & Property Developers —x—

~~सा धारककी or Bearer~~

रुपये Rupees Three Crore only —x—

रु० Rs. 3,00,00,000/-

अदा करें

खाता सं० A/c No. 012620110000272

बैंक आफ इंडिया · BANK OF INDIA

कल्याण (पु) शाखा
कल्याण , महाराष्ट्र

KALYAN (EAST) Branch
KALYAN, MAHARASHTRA, 421 306

IFSC : BKID0000126

OYSTER SAKET INFRASTRUCTURE

⑈000001⑈ 400013123⑆ 011745⑈ 11

---

PAYABLE AT ALL OUR BRANCHES IN CLEARING

दिनांक
Date 16/04/2011

Pay M/s. Anjaneya Land & Property Developers —x—

~~सा धारककी or Bearer~~

रुपये Rupees One Crore only —x—

रु० Rs. 1,00,00,000/-

अदा करें

खाता सं० A/c No. 012620110000272

बैंक आफ इंडिया · BANK OF INDIA

कल्याण (पु) शाखा
कल्याण , महाराष्ट्र

KALYAN (EAST) Branch
KALYAN, MAHARASHTRA, 421 306

IFSC : BKID0000126

OYSTER SAKET INFRASTRUCTURE

⑈000003⑈ 400013123⑆ 011745⑈ 11

---

PAYABLE AT ALL OUR BRANCHES IN CLEARING

दिनांक
Date

Pay M/s. Anjaneya Land & Property Developers —x—

~~सा धारककी or Bearer~~

रुपये Rupees One Crore Fifty Lakhs only —x—

रु० Rs. 1,50,00,000/-

अदा करें

खाता सं० A/c No. 012620110000272

बैंक आफ इंडिया · BANK OF INDIA

कल्याण (पु) शाखा
कल्याण , महाराष्ट्र

KALYAN (EAST) Branch
KALYAN, MAHARASHTRA, 421 306

IFSC : BKID0000126

OYSTER SAKET INFRASTRUCTURE

⑈000004⑈ 400013123⑆ 011745⑈ 11

# OYSTER SAKET INFRASTRUCTURE

**CREDIT / DEBIT VOUCHER**

**Cash / Cheque**

No.

Date 17/01/2011

Credit / Debit Security Deposit Account

| Pay to M/s. Anjaneya Land & Property Developers. Being amount paid by chequeno: 000001 dt: 17-01-2011 towards security Deposit for entering in to Agreement at village Dwarli, Taluka Ambernath, Dist. Thane. | AMOUNT 3,00,00,000 - |
|---|---|
| | 3,00,00,000 - |

Rupees Three Crores Only -

Prepared by [signature] Checked by [signature] Passed by [signature] Received by [signature]

# OYSTER SAKET INFRASTRUCTURE

**CREDIT / DEBIT VOUCHER**

**Cash / Cheque**

No.

Date 17/01/2011

Credit / Debit Security Deposit Account

| Pay to M/s. Anjaneya Land & Property Developers Being amount paid by chequeno: 000003 dt: 16/04/2011 towards Security Deposit as a Due fulfillment of terms of agreement dt: 17/1/2011 of land at Village Dwarli, Taluka - Ambernath, Dist. Thane. | AMOUNT 1,00,00,000 - |
|---|---|
| | 1,00,00,000 - |

Rupees One crore only -

Prepared by [signature] Checked by [signature] Passed by [signature] Received by [signature]

# OYSTER SAKET INFRASTRUCTURE

**CREDIT / DEBIT VOUCHER**

**Cash / Cheque**

No.

Date 17/01/2011

Credit / Debit Security Deposit Account

| Pay to M/s. Anjaneya Land & Property Developers. Being amount paid by chequeno: 000004 dt: towards security deposit as per terms of agreement dt: 17/1/11 The said undated cheque would be deposited on due fulfillment of terms & conditions of the agreement dt: 17/01/2011 between M/s. Oyster Saket Infrastructure & M/s. Anjaneya Land & Property Developers & M/s. K.S. City Private Limited of Land at Village Dwarli, Dist. Thane, Taluka Ambernath | AMOUNT 1,50,00,000 - |
|---|---|
| | 1,50,00,000 - |

Rupees One Crore Fifty Lakhs only -

Prepared by [signature] Checked by [signature] Passed by [signature] Received by [signature]

dwarli4.new

क्र. महसूल/क-१/टे-१४/एनएपी/एसआर-१८/०४

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

दिनांक :- 08 MAR 2006

दाखले :-

१. श्रीमती. ताईबाई परशुराम फुलोरे व इतर यांचे कुळमुखत्यारी श्री. गणपतराज बदनराज मेहता रा. रोहिणी अपार्टमेंट, १०/११. आर आर रोड मुलुंड (प) मुंबई यांचा दि. ३/३/२००४ रोजीचा अर्ज.
२. तहसिलदार अंबरनाथ यांचेकडील चौकशी अहवाल क्र.महसुल/कक्ष१/टे-३/एनएपी/एसआर-१७/२००४, दिनांक ३०/०५/२००४.
३. ग्रामपंचायत द्वारली यांचेकडील नाहरकत दाखला क्र.५७/०३-०४ दिनांक २३/२/२००४
४. सहाय्यक संचालक नगर रचना ठाणे यांनी त्यांचेकडील पत्र जा. क्र. रेखांकन/द्वारली/अंबरनाथ/ससंठाणे/२२२८ दिनांक १०/११/०४.
५. सामान्य शाखा (भुसंपादन विभाग ठाणे) यांचे कडील पत्र क्र.सामान्य/का-४/टे-३/भूसं/कावि-६५४ दि. २७/०१/२००५.
६. उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी उल्हासनगर नागरी संकुलन यांचेकडील क्र. युएलसी/युएलएन/६(१)/एसआर-३१/द्वारली दिनांक ९/८/१९७९ २) क्र. युएलसी/युएलएन/एसआर-३२९/८(४) दि.८/१२/८४ ३) क्र. युएलसी/युएलएन/एसआर-३६ द्वारली/एलएसआर-३०७,३००,३११,३१३,३१६,३१७,३१८,३२१ द्वारली दि.३१/१/८९. ४) क्र. युएलसी/युएलएन/२०/ एसआर-४५४ दि.९/२/२००४
७. दैनिक 'ठाणे वैभव' या वृत्तपत्रात दिनांक १४/४/२००४ रोजी प्रसिध्द केलेला जाहिरनामा.
८. अर्जदार यांनी सादर केलेले हमीपत्र

---

आदेश :-

ज्या अर्थी,श्रीमती ताईबाई परशुराम फुलोरे व इतर यांचे कुळमुखत्यारी श्री. गणपतराज बदनराज मेहता रा. रोहिणी अपार्टमेंट, १०/११. आर आर रोड मुलुंड (प) मुंबई यांनी ठाणे जिल्हयातील अंबरनाथ तालुक्यातील मौजे द्वारली या ठिकाणी स.नं. ३६/१,२,३,४,३६/५पै, ३६/५पै, ३६/५पै, ३६/५पै, ३६/५पै, ३६/५पै, ३६/५पै, ३६/५पै,३६/६पै,३६/७ पै,३६/७पै,३६/११, ३६/१२,३६/१३, ३६/१४. ३५/१पै,३५/१पै, ३५/१पै, ३५/१पै, ३५/१पै,३५/२,३५/३,३५/५अ, ३५/६, ३५/१०,३५/१२,३५/१३, ३५/१४,३५/१५|२अ|५अ, ३४/३पै, ३४/३पै,३७/३,३८, ३९/१ मधील आपल्या मालकीच्या जमीनीतील १,३२,६१०-०० चौ.मी. जमीनीस रहिवास प्रयोजनार्थ रेखांकन / बिनशेती परवानगी मिळणे करिता अर्ज सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी, प्रस्तावित जमीनीचे मालकी हक्काचे बाबतीत दि. १४/४/२००४ रोजीचे दैनिक 'ठाणे वैभव' या वृत्तपत्रात जाहीरनामा प्रसिध्द करणेत आला होता. सदर जाहिरनाम्याचे बाबतीत कोणाचीही तक्रार या कार्यालयात प्राप्त झालेली नाही

ज्या अर्थी, महाराष्ट्र जमीन महसूल ( जमीनीच्या वापरात बदल व बिगर शेतकी आकारणी ) नियम १९६९ या मधील नियम ४(१) आणि त्या मधील अनुसूची तीन भाग दोन परिच्छेद १६ या अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहित करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी याद्वारे ताईबाई परशराम फुलारे व इतर यांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या स.नं. चे एकूण क्षेत्र १३२२६३-५० चौ.मी. पैकी १३२०८८-१५ चौ.मी. रहिवास व १७५-३५ चौ.मी. वाणिज्य या प्रयोजनासाठीच वापर करण्यास सोबतच्या रेखांकन बांधकाम नकाशास मान्यता देत आहेत.

त्या शर्ती अशा:-

१. सदर नकाशास दिलेली परवानगी ही महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६, महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६, नागरी जमीन धारणेची कमाल मर्यादा व विनियमन १९७६, आणि मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ आणि त्या खालील केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यात आली आहे.

२. नकाशात दर्शविलेले सर्व भूखंड, मोकळया जागा, अंतर्गत रस्ते, इ. गोष्टी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचे कडून प्रत्यक्ष जमीनीवर सीमांकन करुन देण्यात येतील. तसेच उप भूखंडाचे क्षेत्र

तालुका निरीक्षक भूमी अभिलेख त्यांच्या कडून निश्चित करुन देण्यांत येईल. रस्त्याचे व मोकळ्या जागेचे क्षेत्र नकाशात दर्शविल्या प्रमाणे करण्यांत येईल.

३. लगतच्या जमीनधारकास आवश्यकता वाटल्यास त्यास नकाशात दर्शविलेल्या रस्त्यांचा जाण्या येण्यासाठी वापर करण्यास परवानगी देण्यात येईल.

४. कोणत्याही भूखंडातील प्रत्यक्ष जागेवर नकाशात दर्शविलेल्या रस्त्यांचा प्रत्यक्षपणे बांधकाम केल्याशिवाय आणि ते सार्वजनिक प्रयोजनार्थ नकाशात दर्शविलेल्या मोकळ्या जागांसह संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या स्वाधीन करुन दिल्या शिवाय त्या भूखंडाची कोणत्याही प्रकारे विल्हेवाट लावता येणार नाही.

५. या आदेशाच्या दिनांका पासून एक वर्षाच्या कालावधीत सर्व भूखंडाची विल्हेवाट लावण्यांत आली पाहिजे. वर उल्लेखिलेल्या कालावधीत जमीनीच्या बिगर शेतकी वापरास सुरुवात करण्यांत आली नसेल तर खाली सही करणा-या व्यक्तीकडून निश्चितपणे पूर्व परवानगी मिळविल्याशिवाय मोकळ्या भूखंडाची पुढे पुनर्विक्री करता येणार नाही.

५अे. एक वर्षाच्या अखेरी पर्यंत कोणत्याही भूखंडाची किंवा उप भूखंडाची विक्री झालेली नसेल आणि अशी विक्री खरेदी करण्याची मुदत वाढवून देण्यांत आली नसेल तर अशा प्रसंगी ही परवानगी रददबातल झाल्याचे समजण्यांत येईल. अशा बाबतीत ही परवानगी धारण करणा-या व्यक्तीस अशा प्रकारे विक्री न झालेल्या हरएक भूखंडाची विक्रीची मुदत वाढवून घेण्यासाठी खालील सही करणा-याकडे करता येईल.

५बी. उपरोक्त शर्तीचे पालन करण्यांत आले नाही आणि सही करणा-या व्यक्तीची आगाऊ परवानगी न घेता एखादा मोकळ्या भूखंडाची पुनर्विक्री करण्यांत आली तर त्या प्रसंगी खरेदीदार आणि विक्रेता या दोघांवर मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८ च्या उपबंधान्वये कार्यवाही करण्यांस ते पात्र ठरतील. परिणामतः विक्रेत्यास अशा भूखंडाच्या किमती एवढी रक्कम दंड म्हणून भरावी लागेल. आणि त्याच बरोबर भूखंडाच्या खरेदीदारांसही दंड म्हणून उक्त भूखंड सरकारच्या स्वाधीन करुन द्यावा लागेल.

५सी. खरेदीदाराने धारण केलेली नागरी जमीन ( धारणेची कमाल मर्यादा व विनियमन ) अधिनियम १९७६ अन्वये विहित केलेल्या मर्यादे पेक्षा अधिक होत असेल तर खरेदीदाराने त्या अधिनियमान्वये आवश्यक असलेले नमुना ६ मधील एक विवरणपत्र त्या अधिनियमाखाली सक्षम प्राधिका-याकडे दाखल केले पाहिजे. खरेदीदाराने असे न केल्यास त्यावर सदर अधिनियमान्वये शिक्षेशी कार्यवाही करण्यांस तो पात्र ठरेल. तसेच त्याची भूखंडाची खरेदीही खालील सही करणा-याकडून रददबातल ठरविण्यांत येईल.

६. प्रत्येक भूखंडाची विक्री करते वेळी किंवा भूखंडाच्या संबंधात त्याच्या विक्रीचा करार करते वेळी वहिवाटदाराने मंजूर झालेल्या नकाशाची एक प्रत आणि त्याच बरोबर या आदेशाची एक प्रत न चुकता प्रत्येक भूखंडधारकास दिली पाहिजे.

६अे. अनुज्ञाग्राही व्यक्तीने / खरेदीदाराने खरेदीच्या दिनांका पासून एक वर्षाच्या आंत अशा भूखंडाच्या बिगर शेतकी परवानगी घेऊन बिगर शेतकी वापरास सुरुवात केली पाहिजे. व जर जमीनीचा बिगर शेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या कालावधीत आवश्यक ती इमारत बांधली पाहिजे. त्या आधी त्याने अनुक्रमे समुचित महसूल व स्थानिक प्राधिकरणाकडून इमारतीसाठी लागणारी आवश्यक ती बांधकाम परवानगी मिळवून घेतली पाहिजे. त्याने असे केले नाही आणि विक्री खरेदीची परवानगी त्याने वाढवून घेतली नाही तर अशी परवानगी रदद समजण्यांत येईल.

६बी. जिल्हाधिकारी ठाणे यांची पूर्व परवानगी मिळविल्या खेरीज कोणत्याही भूखंडाची आणखी पोट विभागणी करता येणार नाही. किंवा कोणतेही भूखंड एकत्रित करता येणार नाही.

७. समुचित प्राधिका-याकडून म्हणजेच महसूल प्राधिकारी व स्थानिक प्राधिकारी यांचे दोन्ही प्राधिका-यांकडून इमारतीचा नकाशा मंजूर करुन घेतल्या खेरीज भूखंडावर कोणतीही इमारत बांधता येणार नाही. इमारतीचे बांधकाम महाराष्ट्र जमीन महसुल नियम व स्थानिक प्राधिकरणाकडून तयार करण्यांत आलेल्या नियमांच्या उपबंधाबरहुकुम असले पाहिजे.

८.नकाशातील सर्व भूखंडाचा निवासी प्रयोजनासाठी वापर केला पाहिजे. त्या करिता या आदेशाच्या दिनांका पासून एक वर्षाच्या आंत भूखंडधारकाने संबंधित नगरपालिका यांची बांधकाम करण्या विषयीची आवश्यक ती परवानगी घेऊन इमारतीचे मंजूर नकाशे सह इमारतीच्या बांधकामास

परवानगी मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी ठाणे यांचेकडे अर्ज केला पाहिजे. त्याने तसे न केल्यास ही परवानगी व्यपगत ( लॅप्स )झाल्याचे समजण्यांत येईल.

९. नकाशात मोकळी जागा म्हणून दर्शविलेल्या जमीनीवर कोणत्याही प्रकारचे बांधकाम करण्याची मुभा नसेल. या मोकळया जागांचा योग्य रीतीने विकास केला पाहिजे. आणि तसे करण्यास फर्माविले असता त्यांची देखभाल करण्यासाठी असे बांधकाम समुचित प्राधिकरणाच्या स्वाधीन करी पर्यंतचे धारकाने त्याची निगा राखली पाहिजे.

१०. बहिवाटदाराने आजुबाजुच्या परिसरात कोणत्याही प्रकारची अस्वच्छता निर्माण होणार नाही अशा रीतीने आपल्या स्वतःच्या खर्चाने आपली पाणी पुरवठयाची व सांडपाण्याची निचरा करण्याची व्यवस्था केली पाहिजे.

११. तालुका निरीक्षक भूमी अभिलेख अंबरनाथ यांनी प्रमाणित केलेली इमारतीचा मोजमापयुक्त असा अधिकृत नकाशा सादर केल्या शिवाय कोणत्याही पोट खंडावर कोणतीही इमारत बांधण्याचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही.

त्या अर्थि आता महाराष्ट्र त्याअर्थी आता महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडे निहीत करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन उक्त जिल्हाधिकारी यांच्दारे ताईबाई परशराम फुलारे व इतर यांना सोबत जोडलेल्या प्रतिलिपीत मध्ये नमूद केलेल्या सर्व्हे नंबर मधील एकूण क्षेत्र १२२६३-५० चौ.मी. एवढया जमीनीच्या क्षेत्रापैकी १२२०८८-१५ चौ.मी. रहिवास व १७५-३५ चौ.मी. वाणिज्य या बिगरशेतकी बांधकाम प्रयोजनार्थ वापर करण्याबाबत पुढील शर्तीवर अनुज्ञा (परमिशन) देण्यात येत आहे.

१२.ही परवानगी अधिनियम त्याखालील केलेले नियम यांना अधिन ठेवून देण्यांत आलेली आहे.

१३. अनुज्ञाग्राही व्यक्तीने ( ग्रँटीने ) अशा जमीनीचा वापर व त्यावरील इमारतीच्या आणि किंवा अन्य बांधकामाचा उपयोग उक्त जमीनीचा ज्या प्रयोजनार्थ उपयोग करण्यांस परवानगी देण्यांत आली असेल त्या प्रयोजनार्थ केवळ केला पाहिजे. आणि त्याने अशी जमीन किंवा तिचा कोणताही भाग किंवा अशी इमारत यांचा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून तशा अर्थाची आगाऊ लेखी परवानगी मिळविल्याशिवाय वापर करता कामा नये. इमारतीच्या वापरावरुन जमिनीचा वापर ठरविण्यांत येईल.

१४. मंजूर विकास प्रस्ताव नकाशा प्रमाणे भूखंड, विकास योजना रस्ता, प्रस्तावित इमारतींची विस्तृत आखणी इ. प्रत्यक्ष जागेवर आखणी करुन घेऊन भूमी अभिलेख विभागाकडून मोजणी करुन घेणे आवश्यक आहे. आखणी करत असताना सभोवतालची मंजुर अभिन्यासातील विकास योजनेतील रस्ते यांचेशी योग्य रीतीने समन्वय असणे आवश्यक आहे.

१५. भूखंडाची पुढील कोणतीही उपविभागणी पूर्व परवानगीशिवाय करता येणार नाही. तसेच त्यातील कोणत्याही एका भागाच्या सुधारीत विकासासाठी कोणताही बदल करता येणार नाही.

१६. नियोजित इमारत ए बी सी डी चा वापर मंजुर बांधकाम नकाशामध्ये दर्शविल्याप्रमाणे रहिवास प्रयोजनार्थ करणे तसेच इमारत इ चा वापर वाणिज्य प्रयोजनार्थ करणे आवश्यक आहे.

१७. रेखांकनातील खुली जागा ही प्रत्यक्ष जागेवर एकूण क्षेत्राच्या १५ टक्के एवढया क्षेत्राची असली पाहिजे व ती कोणत्याही बांधकामाव्यतिरिक्त कायम खुली ठेवण्यासाठी बाग, क्रिडांगण या स्वरुपात करण्यांत याव तसेच सुविधा क्षेत्राला मंजुरी मिळाल्यावर मंजुर नकाशानुसार त्याच अनुज्ञेय कारणासाठी वापर करावा लागेल.

१८. भूखंडावर अस्तीत्वातील बांधकामे काढून टाकणे अर्जदारांवर बंधनकारक राहील.

१९. नियोजित इमारती मधील प्रस्तावित गॅरेजचा वापर फक्त वाहनतळासाठी करावयाचा असून स्टिल्टची कमाल उंची २.२ मी. ठेवणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

२० अर्जदाराने जागेचा विकास करताना विकास पध्दतीने ती विकसित केल्यामुळे व त्या संबंधी नियमांचा फायदा घेतल्यामुळे रेखांकनातील जागेची पुढील कोणतीही उपविभागणी अवैध ठरेल तसेच त्यातील कोणत्याही एका भागाच्या पुढील कोणतीही उपविभागणी अवैध ठरेल तसेच त्यातील कोणत्याही एका भागाच्या सुधारित विकासासाठी स्वतंत्रपणे विचार करता येणार नाही.

२१. प्रस्तावित इमारतीच्या वापरासाठी रस्ता,पाण्याची सोय, सांडपाण्याची व मैला निर्मूलनाची व्यवस्था वीज इत्यादी इतर आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करणे अर्जदारावर बंधनकारक राहील.

२२. नियोजित जागेचे क्षेत्र हद्दी वापर मालकी हक्क, भोगवटादार यांबाबत काही वाद उत्पन्न उदभवल्यास त्यास अर्जदार पुर्णपणे जबाबदार राहील.

२३. नियोजित जागेचे विद्यमान स्थितीत विद्युतवाहिनी जात असल्यास उक्त विद्युत वाहिनीच्या क्षमतेच्या अनुषंगाने आवश्यक ते सामासिक अंतर मंजूर नियंत्रण नियमावली प्रमाणे प्रत्यक्ष जागेवर सोडणे ही अर्जदाराची जबाबदारी राहील.

२४. नियोजित इमारतीचे बांधकाम खालील नमूद केलेल्या तक्त्या प्रमाणे असावे.

| इमारत प्रकार | इमारतीचा मजला | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र (चौ.मी.) एका इ क्षेत्र | एकूण इ.संख्या | एकूण इ. क्षेत्र | इमारतीचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ओ | तळ अधिक २ मजले | ७८६-०९ | १६ | १२५७७-४४ | रहिवास |
| बी | तळ अधिक दोन मजले | ५३२-८० | ५१ | २७१७२-८० | रहिवास |
| सी | तळ अधिक दोन मजले | ३०७-४१ | १० | ३०७४-१० | रहिवास |
| ई | तळ फक्त | ८७-६९ | २ | १७५-३८ | रहिवास |
| | | | एकूण | ४२९९९-७२ | |

२५. अर्जदाराने प्रस्तावित जागेबाबत विकास शुल्क भरणे त्यांचेवर बंधनकारक राहील.

२६. प्रस्तावित बांधकामाचे मंजुर नकाशा प्रमाणे कार्यान्वयन, बांधकाम साहित्याची गुणवत्ता व दर्जा प्रस्तावित इमारतीचे स्टील डिझाईन व त्याप्रमाणे इमारतीचे एकूण आयुष्यमान, अग्नीशामन व्यवस्था इ. बाबत संबंधित जमीन मालक विकास अधिकारपत्रधारक सल्लागार अभियंता,स्ट्रक्चरल अभियंता बांधकाम पर्यवेक्षक यांची जबाबदारी राहील.

२७. प्रस्तावित प्राप्त कागदपत्राच्या आधारे सहाय्यक संचालक, नगर रचना कार्यालयाने अभिप्राय दिलेले आहेत. सदर कागदपत्रांचे विधीग्राहयतेबाबत संबंधित जमीनधारक, विकास अधिकारपत्र धारक, वास्तुविशारद व सल्लागार अभियंता यांची जबाबदारी राहील.

२८. जागेत सांडपाणी अथवा भूपृष्ठीत पाणी वाहून नेण्यासाठी जे मार्ग असतील ते अबाधित ठेवावे.

२९. विषयाधीन जागेवरील नियोजित इमारतीचे बांधकाम करतांना आय.एस. १३९२०-१९९३ मधील भूकंप प्रतिकारक आर. सी. सी. डिझाईन नुसार बांधकाम घटकांचे नियोजन तसेच इमारतीचे स्ट्रक्चर डिझाईन योग्य त्या अर्हता प्राप्त नोंदणीकृत स्थापत्य अभियंता यांचेकडून घेणें आवश्यक असून त्यांचे देख रेखीखाली नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करणें अर्जदारावर/विकासकावर बंधनकारक राहील.

३०. या भूखंडाचे विकासाबाबत ७/१२ उतारा,मालमत्ता रजि. कार्ड या उताऱ्यामध्ये नमूद असलेल्या इतर हक्कधारकांचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

३१. सदरहू प्रस्तावात मंजुरी देण्यापूर्वी नियोजित बांधकामामुळे भूखंडावर आलेल्या कोणत्याही वहिवाटीने आणि इतर हक्कांचा भंग होणार नाही याबाबतची जबाबदारी अर्जदार, विकासक यांच्यावर राहील.

३२. अर्जदार यांनी सादर केलेली माहिती व कागदपत्रे खोटी किंवा दिशाभूल करणारी असल्यास त्याची जबाबदारी अर्जदार विकासक आणि वास्तुविशारद यांच्यावर राहील. तसेच उक्त रेखांकन, बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

३३. या विकास प्रस्तावासोबत बांधकाम परवानगीसाठी विकास नियंत्रण नियमावलीतील तरतूदीनुसार आवश्यक ते विहित अर्ज नमुने सादर करणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

३४. विषयांकित जमीनीलगत भूखंडास, जमीनीस पोहोच रस्ता हा विषयांकित जमीनीमधून आवश्यक असता सदर पोहोच रस्ता प्राप्त करुन घेणे जमीनमालकास विकासकर्त्यास बंधनकारक राहील.

३५. नियम क्र. १५.५.२.१(डी) नुसार पायाभूत सुविधांची तरतूद करणे आवश्यक व ही तरतूद पुरेशी असल्याबाबत सक्षम प्राधिकरणाकडील नाहरकत दाखला नि.क्र. १५.५.१३.(ए,एफ,जी) नुसार अर्जदारानी सादर करणे बंधनकारक राहील.

३६. अर्जदाराने-विकासकर्त्याने प्रस्तावित नकाशामध्ये प्रस्तावित नकाशामध्ये प्रस्तावित विकास योजना रस्त्याच्या क्षेत्राचे चटई क्षेत्र गृहित धरुन वेटेज फॅक्टर काढून ते क्षेत्र प्रस्तावित केलेले आहे परंतु एमएमआरडीए च्या नियमानुसार एरीयल रोड एरिया म्हणजेच डी पी रोडचे क्षेत्र हे नियोजन प्राधिकरणाच्या ताब्यात दिल्यानंतर त्याची रितसर ताबा पावती प्रकरणासोबत सादर केल्यानंतरच उक्त एरियल रोड एरिया हा वेटेज फॅक्टर गृहित धरण्यात येईल. तो पर्यंत रस्त्याखालील क्षेत्राचा वेटेज फॅक्टर देता येत नसल्यामुळे तेवढे प्रस्तावित बांधकाम क्षेत्र हिरव्या रंगाने रद्द केलेले आहे.

३७. ७/१२ उता-यानुसार स.क्र. ३७ चा ३ मधील क्षेत्र २९० चौमी. हे [illegible] वर्ग झाल्याचे निदर्शनास येते तरी या आशया बाबत त्यांचे अभिप्राय घेणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

३८. शासनाचे दि.२०/४/९८ च्या निर्देशानुसार संदर्भिय जागेखालील क्षेत्र खाजण, साल्टपॅन आर्थी, हॉर्टीकल्चर, जमीनी मॅन्ग्रोव्हज जमीनी, हेरीटेज कॅल्युप्राप्त जमीन या मध्ये अंतर्भूत नाहीत.

३९. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४८ नुसार बांधकाम परवानगी ही दिलेल्या तारेखपासून एक वर्षापर्यंत चालू असेल नंतर पुढील वर्षासाठी अर्जदार यांनी योग्य त्या कारणासहीत नियोजन प्राधिकरणाकडे विनंती अर्ज करुन परवानगीचे नुतनीकरण मुदत संपणे आधी करणे आवश्यक राहील. अशा प्रकारचे नुतनीकरण फक्त तीन वर्षापर्यंत केले जाईल. वैध मुदतीत बांधकाम पूर्ण केले नसतील तर नविन बांधकाम परवानगी घ्यावी लागेल. नविन परवानगी घेतांना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमांचा व नियोजित विकास आराखड्याच्या अनुषंगाने छाननी करण्यांत येईल व ती बाब अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

४०. अशी परवानगी देणा-या प्राधिका-याकडून अशा भूखंडाची किंवा त्यांचे जे कोणतेही उपभूखंड करण्या बाबत मंजूरी मिळाली असेल त्या उपभूखंडाची आणखी पोट विभागणी करता कामा नये.

४१. अनुज्ञाग्राही व्यक्तीने (अ) जिल्हाधिकारी व संबंधित नियोजन प्राधिकरण यांचे समाधान होईल अशा रीतीने अशा जमीनीत रस्ते,गटारे वगैरे बांधून आणि (ब) भूमापन विभागा कडून अशा भूखंडाची मोजणी व त्यांचे सीमांकन करुन ती जमीन या आदेशाच्या तारखे पासुन एक वर्षाच्या आंत मंजूर आराखड्या प्रमाणेच काटेकोरपणे विकसित केली पाहिजे. आणि अशा रीतीने ती जमीन विकसित केली जाई पर्यंत त्या जमीनीची कोणत्याही रीतीने विल्हेवाट लावता कामा नये.

४२. अनुज्ञाग्राही व्यक्तीस असा भूखंड विकावयचा असेल किंवा त्याची इतर प्रकारे विल्हेवाट लावायची असेल तर अशा अनुज्ञाग्राही व्यक्तीने तो भूखंड या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीचे पालन करुनच विकणे किंवा अशा शर्तीनुसारच त्याची अन्य प्रकारे विल्हेवाट लावणे आणि त्यांचे निष्पादित केलेल्या विलेखात तसा खास उल्लेख करणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

४३. प्रस्तावित इमारत किंवा कोणतेही काम ( असल्यास ) त्यांच्या बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी अनुज्ञाग्राही व्यक्तीने ( ग्रँटीने ) ग्रामपंचायत द्वारली यांची असे बांधकाम करण्या विषयाची आवश्यक ती परवानगी मिळविणे हे अशा व्यक्तीवर बंधनकारक असेल.

४४. एखाद्या सक्षम प्राधिका-याकडे इमारतीचे बांधकामाचे नियंत्रण करण्याचे अधिकार निहित झालेले असतील तर अशा प्रसंगी अनुज्ञाग्राही व्यक्तीने सदर प्राधिका-याकडून इमारतीचे नकाशे मंजूर करुन घेतले पाहिजेत. कोणत्याही प्रकरणी त्याने अशा इमारतीचे नकाशे महाराष्ट्र जमीन महसूल ( जमीनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी ) नियम १९६९ यात जोडलेल्या अनुसूची तीन मध्ये समाविष्ट असलेल्या उपबंधानुसारच काटेकोरपणे तयार केले पाहिजेत. आणि ते ठाणे जिल्हाधिका-याकडून मंजूर करुन घेतले पाहिजेत. आणि अशा मंजूर नकाशानुसारच इमारतीचे बांधकाम केले पाहिजे.

४५. अनुज्ञाग्राही व्यक्तीने सोबत जोडलेल्या मंजूर नकाशात दर्शविल्या प्रमाणे सीमांतिक मोकळे अंतर ( ओपन मार्जिनल डिस्टंसेस ) सोडले पाहिजे.

४६. या आदेशाच्या दिनांका पासून एक वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमीनीचा बिगर शेती प्रयोजनासाठी वापर करण्यास सुरुवात केली पाहिजे. मात्र वेळोवेळी असा कालावधी वाढविण्यांत आला असेल तर ती गोष्ट अलाहिदा. अनुज्ञाग्राही व्यक्तीने उपरोक्त प्रमाणे न केल्यास ही परवानगी रद्द करण्यांत आली असल्याचे समजण्यात येईल.

४७. अनुज्ञाग्राही व्यक्तीने अशा जमीनीचे बिगर शेतकी प्रयोजनार्थ वापर करण्यांस ज्या दिनांक पासून सुरुवात केली असेल किंवा ज्या दिनांकास त्याने अशा जमीनीच्या वापरात बदल केला असेल तर तो दिनांक त्याने एक महिन्याच्या आंत त्याच्या मार्फत अंबरनाथ तहसिलदारांस कळविले पाहिजे. जर तो असे करण्यांस चुकेल तर महाराष्ट्र जमीन महसुल ( जमीनीच्या वापरातील बदल व बिगरशेतकी आकारणी ) नियम १९६९ मधील नियम ६ अन्वये त्याच्यावर कार्यवाही करण्यांस असा अनुज्ञाग्राही पात्र ठरेल.

४८. अशा जमीनीचा त्या प्रयोजनार्थ वापर करण्यांस अनुज्ञाग्राहीस परवानगी देण्यांत आली असेल त्या प्रयोजनार्थ वापर करण्यांस प्रारंभ करण्याच्या दिनांका पासून सदर अनुज्ञाग्राहीने त्या जमीनीच्या संबंधात दर चौ.मी. मागे ०.१.५० रुपये दराने बिगर शेतकी आकारणी दिली पाहिजे. किंवा परवानगीच्या तारखेच्या पुर्वलक्षी प्रभावाने अथवा त्यानंतर [illegible] बिनशेती दराने बिनशेती आकार देणे बंधनकारक राहील.अशा जमीनीच्या वापरात कोणत्याही प्रकारचा बदल करण्यांत आला तर त्या प्रसंगी निराळ्या दराने बिगर शेतकी आकारणीच्या हमीची मुदत अजून समाप्त व्हावयाची आहे ही गोष्ट विचारात घेण्यात येणार नाही.

४९.सदर जागेची अती तातडीची मोजणी फी रक्कम रु.५५,५००/- ( अक्षरी रुपये पंचावन्न हजार पाचशे मात्र ) चलन क्र. १०२/०६ दिनांक ०३/०३/२००६ अन्वये शासन जमा केली आहे.

५०. प्रस्तुत जमीनीत अनुज्ञाग्राही यांनी बिनशेती परवानगी घेणेपूर्वी वापर सुरु केलेमुळे [illegible] व आकार रक्कम रु.२५८/- ( अक्षरी रु.दोनशे अठ्ठावण्ण रुपये मात्र) तहसिलदार [illegible] पावती क्र. ५१५६९४७ दि.०७/०३/२००६ अन्वये शासनजमा केले आहेत.

५१. प्रस्तुत जमीनीपैकी स. नं. ३१/२ क्षेत्र ०-२०-५ ही कुळकायदा कलम ४३ [illegible] येणारी नजराण्याची रक्कम रु.११०/- ( अक्षरी रु.एकशे दहा रुपये मात्र) तलाठी सजा [illegible] यांचेकडे पावती क्र. ५१५६९४१ दि.१७/०३/२००६ अन्वये सरकारजमा केली आहे.

५२. स.क्र. ३७/२ मधील क्षेत्र २१०-०० चौ.मी. हे एम आय डी सी कडे वर्ग झालेमुळे बिनशेती जागेवर बांधकामास सुरुवात करणेपूर्वी एम आय डी सी कडील नाहरकत दाखला प्राप्त करुन घेणे अनुज्ञाग्राही यांचेवर बंधनकारक राहील.

५३. भूमापन विभागाकडून जमीनीची मोजणी करण्यांत आल्या नंतर अशा जमीनीचे जितके क्षेत्रफळ आढळून येईल तितक्या क्षेत्रफळानुसार या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेले क्षेत्र तसेच बिगरशेतकी आकारणी यांत बदल करण्यांत येईल.

५४. सदर जमीनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून दोन वर्षाच्या कालावधीत अनुज्ञाग्रहीने अशा जमीनीवर आवश्यक ती इमारत बांधली पाहिजे. अन्यथा सदरहू आदेश रद्द समजण्यांत येईल. व अनुज्ञाग्राही यांना अकृषिक परवानगीसाठी नव्याने अर्ज सादर करावा लागेल.

५५. पुर्वीच मंजूर केलेल्या नकाशाबरहुकूम आगोदरच बांधलेल्या इमारतीत अनुज्ञाग्राहीने कोणतीही भर घालता कामा नये किंवा ती मध्ये कोणताही फेरबदल करता कामा नये. मात्र अशी भर घालण्यासाठी किंवा फेरबदल करण्यासाठी जिल्हाधिका-यांची परवानगी घेतली असेल आणि अशा भरीचे किंवा फेरबदलाचे नकाशे मंजूर करुन घेतले असतील तर ती गोष्ट वेगळी.

५६.जमीनीच्या बिगरशेतकी वापरास प्रारंभ केल्याच्या दिनांका पासून एक महिन्याच्या कलावधीत अनुज्ञाग्राही व्यक्तीने महाराष्ट्र जमीन महसुल (जमीनीच्या वापरात बदल व बिगरशेतकी आकारणी )नियम १९६९ यातील अनुसूची पाच मध्ये दिलेल्या नमुन्यात एक सनद करुन देऊन तीत या आदेशातील सर्व शर्ती समाविष्ट करणे त्यास बंधनकारक असेल.

५७. प्रस्तावित बिनशेती जमीनीच्या बिगरशेतकी आकारणीच्या पाचपट रक्कम रु.१,३२,६१०/-( अक्षरी रु. एक लाख बत्तीस हजार सहाशे दहा रुपये मात्र ) रुपांतरीत कर ( कन्व्हर्शन टॅक्स ) म्हणून गटविकास अधिकारी पंचायत समिती, अंबरनाथ यांचे कडील पावती दिनांक ०८/०३/२००६ अन्वये सरकार जमा केली आहे.

५८. या आदेशात आणि सनदीमध्ये नमूद केलेल्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचे अनुज्ञाग्राही व्यक्तीने उल्लंघन केल्यास उक्त अधिनियमाच्या उपबंधान्वये असा अनुज्ञाग्राही ज्या कोणत्याही शास्तीस पात्र ठरेल त्या शास्तीस बाधा न येऊ देता ठाण्याच्या जिल्हाधिका-यास तो निर्दिष्ट करेल असा दंड आणि आकारणी भरल्यानंतर उक्त जमीन किंवा भूखंड अर्जदाराच्या ताब्यात राहू देण्याचा अधिकार असेल.

५८अ. वरील खंड ५८) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही या परवानगीच्या तरतुदीविरुध्द जाऊन कोणतीही इमारत किंवा बांधकाम उभे करण्यांत आले असेल किंवा तरतुदी विरुध्द या इमारतीचा किंवा बांधकामाचा वापर करण्यांत आला असेल तर विनिर्दिष्ट मुदतीच्या आत अशा रीतीने उभारलेली इमारत काढून टाकण्या विषयी किंवा तीत फेरबदल करण्याविषयी ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्याने निर्देश देणे विधी संमत असेल. तसेच ठाण्याच्या जिल्हाधिकाऱ्याला अशी इमारत किंवा बांधकाम काढून टाकण्याचे किंवा तीत फेरदल करण्याचे काम करवून घेण्याचा किंवा अशा प्रीत्यर्थ आलेला खर्च अनुज्ञाग्राही व्यक्तीकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करुन घेण्याचा अधिकार असेल.

५९. दिलेली ही परवानगी मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम १९४८, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि नगरपालिका अधिनियम इ.सारख्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याचे कोणतेही उपबंध प्रकरणाच्या अन्य संबंधीत दाबींच्या बाबतीत लागू होतील. त्या उपबंधाच्या अधिन असेल.

६०. अनुज्ञाग्राही यांनी सहा.संचालक, नगर रचना ठाणे कडील बांधकाम नकाशा व्यतिरिक्त जादा बांधकाम केल्यास अगर बांधकामा मध्ये बदल करुन ज्यादा चटईक्षेत्र निर्देशांक वापरल्यास अनुज्ञाग्राही हे महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ अन्वये फौजदारी स्वरुपाच्या गुन्हा दाखल करण्यांस पात्र रहातील व असे जादा बांधकाम दूर करण्यांस पात्र राहील.

सही/-

( नंदकुमार जंत्रे )

जिल्हाधिकारी ठाणे

प्रति,

श्रीमती ताईबाई परशुराम फुलोरे व इतर

रा. द्वारली ता.अंबरनाथ जि. ठाणे

निर्गमित केले

जिल्हाधिकारी ठाणे करिता

| परिशिष्ट अ | | | |
|---|---|---|---|
| अ क्र. | स. नं. | क्षेत्र | जमिन मालकाचे नांव |
| १ | ३९/१अ/२अ/५अ | ४५००-०० | शांताबाई बारकु म्हात्रे |
| २ | ३४/३ पै | २७३०-०० | गोपाळ जानू राणे |
| ३ | ३५/१ पै | २९५०-०० | रमाकांत रामचंद्र राणे व इतर - ३ |
| ४ | ३५/१ पै | ५२०-०० | विठ्ठल जानू राणे |
| ५ | ३५/१ पै | १४५०-०० | लक्ष्मण जानू राणे |
| ६ | ३५/१ पै | ५००-०० | गोपाळ जानू राणे |
| ७ | ३५/१ पै | ११८०-०० | शंकर नारायण राणे व इतर |
| ८ | ३५/२ | २६८०-०० | बाबा जानू राणे |
| ९ | ३५/३ | १९७०-०० | वासुदेव गंगाराम व इतर - |
| १० | ३५/५ ब | ६००-०० | शंकर नारायण राणे व इतर - ३ |
| ११ | ३५/७ | ११७०-०० | सुरफबाई नामदेव चिकणकर व इतर |
| १२ | ३५/१० | ४९०-०० | वासुदेव गंगाराम व इतर - ६ |
| १३ | ३५/१३ | ३००-०० | तुळसाबाई सिताराम |
| १४ | ३५/१४ | १००-०० | राजाराम गणपत चिकणकर व इतर - |
| १५ | ३६/१ | २२००-०० | ताईबाई परशुराम फलोरे |
| १६ | ३६/२ | ४०००-०० | ताईबाई परशुराम फलोरे |
| १७ | ३६/३ | ६००-०० | ताईबाई परशुराम फलोरे |
| १८ | ३६/४ | ११००-०० | शांताबाई बारकु म्हात्रे |
| १९ | ३६/५ पै | ३८०-०० | वासुदेव गणपत राणे |
| २० | ३६/५ पै | ७५०-०० | लक्ष्मण जानू राणे |
| २१ | ३६/५ पै | ३०५०-०० | रमाकांत रामचंद्र राणे व इतर - ३ |
| २२ | ३६/५ पै | ७५०-०० | विठ्ठल जानू राणे |
| २३ | ३६/५ पै | ७३०-०० | हरिभाऊ सिताराम म्हात्रे |
| २४ | ३६/५ पै | ३८०-०० | महादू गणपत राणे |
| २५ | ३६/५ पै | ७३०-०० | गोपाळ जानू राणे |
| २६ | ३६/५ पै | २९००-०० | शंकर नारायण राणे व इतर - ३ |
| २७ | ३६/६ पै | १५००-०० | लक्ष्मण रामभाऊ पाटील |
| २८ | ३६/७ पै | १२०००-०० | धानीबाई नामदेव चिकणकर व इतर - |
| २९ | ३६/७ पै | १५०००-०० | वासुदेव गंगाराम व इतर - ६ |
| ३० | ३६/११ | ९१००-०० | तुळसाबाई सिताराम |
| ३१ | ३६/१२ | ४०००-०० | धानीबाई नामदेव व इतर - ६ |
| ३२ | ३६/१३ | १२१००-०० | बामा जानु राणे |
| ३३ | ३६/१४ | १४००-०० | बामा जानु राणे |
| ३४ | ३७/३ | २०७०-०० | बामा जानु राणे |
| ३५ | ३८ | २११००-०० | शांताबाई बारकु म्हात्रे |
| ३६ | ३९/१ | ४६८०-०० | शांताबाई बारकु म्हात्रे |
| ३७ | ३९/२ | ६३०३-०० | तुळशीराम हाशा गायकर व इतर - ६ |
| एकूण | | १,२२,२६३-०० | |

(सही)
जिल्हाधिकारी ठाणे करिता




For Oyster Saket Infrastructure

Authorised Signatory.

# घोषणा पत्र

मी ....गणपतराव बदनराव मेहता..........

..............याव्दारे घोषित करतो की, दुंयम निबधक ......[illegible]..........

यांचे कार्यालयात करारनामा... या शिर्षकाचा दस्त नोंदणीसाठी सादर करण्यात आला आहे. श्री शांताबाई [illegible] मोहिते.........व इ. यांनी दिनांक ........ रोजी मला दिलेल्या कुलमुखत्यारपत्राच्यां आधारे मी, सदर दस्त नोंदणीस सादर केला आहे/ निष्पादित करून कबूली जबाब दिला आहे सदर कुलमुखत्यार पत्र लिहून देणार यांनी कुंलमुखत्यार पत्र रदद केलेला नाही किंवा कुंलमुखत्यार पत्र लिहून देणार व्यक्ती पैकी कोणीही मयत झालेले. नाही. किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कुलमुंखत्यार पत्र रददबाबत ठरलेले नाही. सदराचे कुलमुखत्यार पत्र पुर्णपणे वैध असून उपरोक्त कृती करण्यास मी पुर्णत: सक्षम आहे. सदरचे कथन चुकीचे आढळुंन आल्यास. नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये शिक्षेस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

उहन - ३
दस्त क्र. २८२/२०११
८२/५५

कुंलमुंखत्यारपत्रधारकाचे नांव

व सही

दिनांक–

उहन - ३
दस्त क्र. २८२/२०११
५५

# घोषणा पत्र

मी गणपतराव [illegible]

.................याव्दारे घोषित करतो की, दुंयम निबधक अहमदनगर-3

यांचे कार्यालयात करारनामा या शिर्षकाचा दस्त नोंदणीसाठी सादर करण्यात आला आहे. श्री वासुदेव शंकरराव [illegible] इ. यांनी दिनांक ........ रोजी मला दिलेल्या कुलमुखत्यारपत्राच्या आधारे मी, सदर दस्त नोंदणीस सादर केला आहे/ निष्पादित करून कबूली जबाब दिला आहे सदर कुलमुखत्यार पत्र लिहून देणार यांनी कुलमुखत्यार पत्र रदद केलेला नाही किंवा कुलमुंखत्यार पत्र लिहून देणार व्यक्ती पैकी कोणीही मयत झालेले. नाही. किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कुलमुंखत्यार पत्र रददबाबत ठरलेले नाही. सदराचे कुलमुखत्यार पत्र पुर्णपणे वैध असून उपरोक्त कृती करण्यास मी पुर्णत: सक्षम आहे. सदरचे कथन चुकीचे आढळुंन आल्यास. नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ८२ अन्वये शिक्षेस मी पात्र राहीन याची मला जाणीव आहे.

उ.नि.न.-3
दस्त क्र ८४२/२०११
४३/५५

[illegible]

कुलमुंखत्यारपत्रधारकाचे नांव

व सही

दिनांक–

Transport Department - National Capital Territory of Delhi

Licence to drive vehicles throughout India

| | |
|---|---|
| LICENCE NO. | : P04062002300857 R |
| NAME | : JAGDISH LUTHRA |
| Son of | : LATE LEKH RAJ |
| ADDRESS | : A-263 MEERA BAGH NEW DELHI 110087 |
| DT. OF BIRTH | : 10/04/1948 |
| VEHICLE CLASS | : MCYL 21/06/2002 |
| | LMV(NT) 21/06/2002 |

(Holder's Signature)

DT. OF ISSUE : 21/06/2007

VALIDITY : 20/06/2012

INV CARR NO. : NA

Sig. Of Licencing Authority (WZ)

9889 .99

88 / 44